Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ३४ ] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर २१-२७, २०२१/आश्विन २९-कार्तिक ५, शके १९४३ [पृष्ठे १४, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४७.

### जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांजकडून

**वाचावे :–**(१) मा. सहसंचालक (पणन), पणन संचालनालय, म. रा., पुणे यांचे पत्र क्र. पणन-५-कृउबास-तुमसर-चौकशी-२६६६-२०२०, दिनांक २३-०७-२०२०.

(२) या कार्यालयाचे पत्र जा. क्र. जिउनि-भं-पणन-कृउबास-तु-चौकशी-श्री. कारेमोरे तक्रार-३७८५/२०, दिनांक ०७-०९-२०२०.

(३) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तुमसर तालुका यांचे पत्र जा. क्र. सनितु-पणन-कृउबास-तु-चौकशी-श्री. कारेमोरे तक्रार-१३८३/२०२०, दिनांक २९-०९-२०२०.

(४) महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेद-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४५(१).

(५) महाराष्ट्र शासन, सहकारी व कृषी विभागाचे अधिसूचना क्र. एपीएम-२०८१-३६३४०-४४०-११-स, दिनांक ०५-०९-१९८१.

(६) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस, जिउनि-भं-कृउबास-तु-कलम ४५(१)-कारणे दाखवा नोटीस-६३१७-२०२०, दिनांक १६-१२-२०२०.

(७) मा. सरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांचे पत्र जा. क्र. कृपमं-बास-तुमसर-क ४५(१)-संमं खुलासा-३४७-२०२१, दिनांक ०९-२-२०२१.

(८) या कार्यालयाचे अभिप्राय जा. क्र. जिउनि-भं-कृउबास-तु-कलम ४५-(१)-पणन मंडळ-अभिप्राय-२५१५/२०२१, दिनांक ७-७-२०२१.

(९) मा. सरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांचे पत्र जा. क्र. कृपमं-बास-तुमसर-क-४५(१)-१४०४-२०२१, दिनांक ०६-०८-२०२१.

(१०) सहाय्यक सरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांचे पत्र जा. क्र. कृपमं-बास-तुमसर-क-४५(१) कादानो-अभिप्राय-१५१८-२०२१, दिनांक ०२-०९-२०२१ या कार्यालयास प्राप्त दिनांक १५-०९-२०२१.

ज्याअर्थी, कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर, जि. भंडारा या बाजार समितीची स्थापना व रचना महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्याअंतर्गतचे नियम, १९६७ मधील तरतुदीनुसार झाली आहे. (ज्याचा यापुढे उल्लेख केवळ " पणन कायदा व नियम " असा केलेला आहे) त्यामुळे सदरहू बाजार समिती व तिच्या विद्यमान संचालक मंडळाला उपरोक्त नमूद पणन कायद्यातील व त्या अंतर्गतच्या नियमातील तरतुदीनुसार तसेच सदरहू बाजार समितीच्या उपविधीमधील तरतुदीनुसार शासनाचे व मा. पणन संचालक, पणन संचालनालय, म. रा., पुणे यांचे परिपत्रकाद्वारे दिलेले निर्देश तथा सूचना यांना अनुसरून कृषी उत्पन्न बाजार समितीचे कामकाज चालविणे आवश्यक व बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी, कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर, जि. भंडारा या बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने दिनांक १६ सप्टेंबर २०१६ पासून पदभार स्विकारलेला आहे. त्यामुळे सदरहू विद्यमान संचालक मंडळाला सदरहू बाजार समितीचे कामकाज महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्याअंतर्गतचे नियम, १९६७ मधील तरतुदी, शासनाचे व मा. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रकीय निर्देश तथा सूचना, तसेच बाजार समितीच्या पोट-नियमानुसार चालविणे बंधनकारक आहे.

ज्याअर्थी, कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर, या बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने खालील नमूद मुद्यांबाबत महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्याअंतर्गतचे नियम, १९६७ मधील तरतुदी, शासनाने व मा. पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रकीय निर्देश तथा सूचना, तसेच बाजार समितीच्या पोट-नियमाचे पालन केले नसल्याचे, तसेच सोपविलेली जबाबदारी व कर्तव्य पार पाडण्यात कसूर केल्याने, संदर्भिय क्र. (६) अन्वये महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४५(१) नुसार कारणे दाखवा नोटीस कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या संचालक मंडळाला बजावण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, विषयांकित प्रकरणी या कार्यालयात दिनांक ०४ जानेवारी २०२१, दिनांक २९ जानेवारी २०२१, दिनांक १२ फेब्रुवारी २०२१ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. परंतु, दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या वतीने ॲड. श्री. एस. एस. पालीवाल यांनी वकालतनामा सादर करून, लेखी म्हणणे सादर केले व तोंडी युक्तीवादाकरीता मुदत मिळणेसाठी विनंती केली. त्यामुळे तोंडी युक्तीवादाकरीता दिनांक १९ मार्च २०२१, दिनांक ९ एप्रिल २०२१, दिनांक ७ मे २०२१, २१ मे २०२१ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदरहू कालावधीमध्ये कोव्हीड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मुदत देण्यात आली. त्यानंतर दिनांक ११ जून २०२१ रोजी झालेल्या सुनावणीला कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या वतीने ॲड. श्री. एस. एस. पालीवाल यांनी युक्तीवाद केला व त्यांचे युक्तीवादानंतर प्रकरण पुढील कार्यवाहीकरीता बंद करण्यात आले.

ज्याअर्थी, पणन कायद्यातील उक्त कलमांतर्गत या कार्यालयाने बजावलेल्या कारणे दाखवा नोटीसीतील मुद्दे, आक्षेपावर कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसरचे संचालक मंडळाने सादर केलेले लेखी म्हणणे, कागदपत्रे व संचालक मंडळाच्या वतीने ॲड. श्री. एस. एस. पालीवाल यांनी केलेला तोंडी युक्तीवाद यावर या कार्यालयाचे सविस्तर विवेचन खालीलप्रमाणे आहेत.

**मुद्दा क्र. १ :**—ज्याअर्थी, कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या ओपन शेड बांधकाम करण्याकरीता मा. सरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी दिनांक ११ डिसेंबर २०१४ च्या रक्कम रु. ७३,८१,८२४ मंजूर निविदा दर व १८.२५% जादा अंदाजपत्रकीय रक्कम रु. ९७,९५,६८० या अटी व शर्तीस अधिन राहून मान्यता दिलेली आहे. त्यानुसार बाजार समितीने सदरहू बांधकामाचा वर्क ऑर्डर दिनांक २२ डिसेंबर २०१४ रोजी कंत्राटदार श्री. ए. ए. रजवी यांना दिलेला असून, सदरहू बांधकाम दिनांक २१ सप्टेंबर २०१५ पर्यंत पूर्ण करण्याबाबत कळविलेले होते. परंतु, कंत्राटदाराने बांधकाम मुदतीत पूर्ण न करता, बांधकाम पूर्ण करण्याकरीता मुदतवाढ मिळणेबाबत बाजार समितीकडे विनंती अर्ज दिला. त्यानुसार बाजार समितीच्या संचालक मंडळाने दिनांक ३१ मार्च २०१८ रोजीच्या सभेमध्ये ठराव क्र. १०(६) नुसार कंत्राटदारास बांधकाम करण्याकरीता मुदतवाढ दिली. सदर मुदतवाढीला महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांची मंजुरी न घेता, बाजार समितीच्या संचालक मंडळाने कंत्राटदाराला परस्पर मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळे सदर कामाचा खर्च वाढून, बाजार समितीला आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावरून सदर बाजार समितीच्या संचालक मंडळाने महाराष्ट्र राज्य, कृषी पणन मंडळ, पुणे यांचे दिनांक ११ डिसेंबर २०१४ च्या आदेशाचे पालन करण्यास व कर्तव्यपालनात हेतूपुरस्सर कसूर केल्याचे दिसून येते.

सदरहू मुद्यावर कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसरचे संचालक मंडळाने समितीचे मार्केट यार्डवर प्रशासकीय ईमारतीचे मागील भागात ओपन ओट्यावर शेड बांधकाम करण्याकरीता महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांचे दिनांक ५ एप्रिल २०१३ अन्वये रु. ७७,५०,९१५ चे अंदाजपत्रकीय रक्कम मंजूर झाली होती. त्यानुसार तरूण भारत व हितवाद या वर्तमानपत्रामध्ये दिनांक ७ नोव्हेंबर २०१४ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आली. त्यामध्ये कंत्राटदार श्री. ए. ए. रजवी यांची निविदा जादा असल्याने संचालक मंडळ सभा दिनांक २९ नोव्हेंबर २०१४ रोजी ठराव क्र.७ नुसार मंजुरी देण्यात आली. सदरहू जादा दराच्या प्राप्त निविदेस कलम १२(१) ची मंजुरी मिळणेबाबत प्रस्ताव महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांना दिनांक १ डिसेंबर २०१४ नुसार सादर करण्यात आला. सदरच्या प्रस्तावास महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी त्यांचे पत्र जा. क्र. कृपमं-अभी-क. १२(१)-कृउबास-तुमसर-नि.भं-३४३८-२०१४, दिनांक ११ डिसेंबर २०१४ रोजीचे पत्रानुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु. ७३,८१,८२४ तसेच यावर १८.२५% जादा दरास मंजुरी प्रदान केली. त्यानुसार वर्क ऑर्डर कंत्राटदारास देण्यात आले. परंतु, बाजार समितीमध्ये निधीचे उपलब्धतेनुसार कर्मचा-यांचे पगार व प्रशासकीय खर्च भागवून, शिल्लक निधीमधून बांधकामाचे बिल देण्यात येत होते. तसेच जिल्हा पणन अधिकारी, भंडारा यांचेकडून ७० ते ८० लक्ष घेणे असलेली बाजार फी मिळण्यास विलंब झाला. त्यामुळे उपलब्ध निधीनुसार देयक देण्यास विलंब होत होता. त्यामुळे बाजार समितीने जा. क्र. ७११/२०१६-१७, दिनांक ८ मार्च २०१७ नुसार महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांचेकडे रु. १.५० कोटीचे कर्जप्रकरण दाखल केले. त्यास महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी जा. क्र. १३३०/२०१७, दिनांक १८ जुलै २०१७ नुसार कर्ज मंजूर केले. सदरच्या कर्जाचा पहिला हप्ता मिळण्याकरीता ११ महिन्याचा कालावधी लागला म्हणून वेळोवेळी संचालक मंडळाचे ठराव घेवून, बांधकामास मुदतवाढ देण्यात येत होती. सदर बांधकाम महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांचे अटी व शर्तीनुसार करण्यात आले आहे. यामुळे समितीचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. असा खुलासा/लेखी म्हणणे दिलेले आहे.

सदरहू मुद्याबाबत बाजार समितीच्या संचालक मंडळाने सादर केलेला खुलासा मोघम स्वरूपाचा असून, बाजार समितीच्या संचालक मंडळाने महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांचे दिनांक ११ डिसेंबर २०१४ चे आदेशातील अटी व शर्ती सह ओपन शेड बांधकाम करण्याची परवानगी दिली असता, सदरहू पणन मंडळाच्या अटी व शर्तीचे बाजार समितीच्या संचालक मंडळाने उल्लंघन करून, पणन मंडळाची पूर्वपरवानगी न घेता कंत्राटदारास आपलेच स्तरावर मुदतवाढ दिलेली असल्याचे स्पष्टपणे निदर्शनास येत असल्याने, बाजार समितीच्या संचालक मंडळाने उक्त मंजुरी आदेशाचे पालन करण्यास व कर्तव्यपालनात हेतूपुरस्सर कसूर केल्याचे स्पष्ट होत आहे.

**मुद्दा क्र. २ :–**ज्याअर्थी, कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या संचालक मंडळाने दिनांक ११ जानेवारी २०१७ ला व्हाऊचर नं. २३९० प्रमाणे ३,००० नग शॉल, श्री. दुर्गा वस्त्र भंडार, नेहरू नगर, तुमसर यांचेकडून एक नग रक्कम रु. १२२ प्रमाणे खरेदी करून, एकूण रक्कम रु. ३,६६,००० ला बाजार समितीने खरेदी केलेल्या आहेत. सदरहू मुद्याबाबत महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४०(ब) अन्वये चौकशी करण्यात आलेली असून, चौकशी अधिकारी यांनी त्यांचे अहवालात असे नमूद केले की, कृषी उत्पन्न बाजार समितीने दिनांक २५ नोव्हेंबर २०१६ रोजीच्या सभेतील ठराव क्र. ५ नुसार बाजार समितीचे कार्यक्षेत्रातील सहकारी संस्थांचे पदाधिकारी व शेतकरी यांच्यासाठी दिनांक १ जानेवारी २०१७ रोजी शेतकरी मेळावा व सर्वसाधारण सभा आयोजत करून, शॉल वाटप केलेले आहे. सदरहू शॉल खरेदी करताना बाजार समितीने आवश्यक निविदा प्रक्रियेचा अवलंब न केल्यामुळे, तसेच सदरहू खर्चास सक्षम अधिका-यांची परवानगी घेतली नसल्याने, सदरहू बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतूपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास येते.

या मुद्यासंबंधाने बाजार समितीच्या संचालक मंडळाने संचालक मंडळ सभा दिनांक २५ नोव्हेंबर २०१६ रोजीचे सभेतील ठराव क्र. ५ अन्वये समितीचे कार्यक्षेत्र तुमसर व मोहाडी तालुक्यातील प्रगतशील शेतकरी, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य व ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच व सदस्य यांचेकरीता शेतकरी मेळावा व चर्चासत्र आयोजन करून, लागणारा खर्च समिती फंडातून करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्याप्रसंगी काही राजकीय मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पाडण्यात आला. त्यासाठी समितीने स्थानिक कापड विक्रेत्यांकडून कोटेशन मागवून सर्वात कमी दराचे कोटेशन सभेत मंजूर झाले. त्यानुसार ३,००० नग शॉली खरेदी केले आहे. याची रक्कम रु. ३,६६,००० आहे. अर्थसंकल्प शिर्षकामधील मुख्य व दुय्यम बाजार आवार शिर्षकावरील उपशिर्षक इतर खर्च अंतर्गत खर्ची घेतले आहे. सदर उपशिर्षकावर एकूण रुपये २१,२५,९६८ खर्च झालेला आहे. सन २०१६-१७ चे मुळ अर्थसंकल्पीय मंजूर तरतूद रु. १०,००,००० मंजूर होती. या तरतुदीपेक्षा रुपये ११,२५,९६८ खर्च झालेला आहे. यास मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांचे दिनांक २६ डिसेंबर २०१९ रोजीचे पत्रान्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. असे लेखी म्हणणे दिलेले आहे.

सदरहू मुद्याबाबत बाजार समितीच्या संचालक मंडळाने सादर केलेला खुलासा मोघम स्वरूपाचा असून, बाजार समितीचा हा मेळावा पुर्वनियोजित असताना, शॉली खरेदी करताना सक्षम अधिका-याची परवानगी घेवून, निविदा प्रक्रियेचा अवलंब करणे आवश्यक होते. परंतु, बाजार समितीने अर्थसंकल्पीय मंजूर तरतुदीपेक्षा जास्त रक्कम खर्च करून, प्रलंबित कालावधीनंतर कार्योत्तर मंजुरी घेतलेली आहे. याचाचा अर्थ असा की, योग्य निविदा प्रक्रियेचा अवलंब न करता व्यवहारातील रक्कमा इतरत्र वापरल्या म्हणून मर्यादेपेक्षा जास्तीचा खर्च झाला. यावरून बाजार समितीचे संचालक मंडळ उक्त पणन कायद्यातील कलम ३७ चे उल्लंघन करीत असल्याचे व निविदा प्रक्रियेचा पालन करण्यात कसूर केल्याचे स्पष्टपणे निदर्शनास येत आहे.

**मुद्दा क्र. ३ :–**ज्याअर्थी, दिवाळी निमित्त मिठाई वाटप करताना हल्दीराम फुड्स यांना दिनांक २ फेब्रुवारी २०१७, वाऊचर क्र. २७६५ अन्वये रक्कम रुपये ७७,४२५ अदा केलेले असून, सदरहू मिठाई बाबत रु. ५७,००० सह इतर बिल समाविष्ट आहेत व सदरहू खर्चास खात्याची परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे सदरहू खर्च हा नियमबाह्य असून तो वसुलीस पात्र आहे. चौकशी अधिकारी यांनी त्यांचे अहवालात असे नमूद केले की, सदरहू खर्चास बाजार समिती सभा दिनांक २५ नोव्हेंबर २०१६ मधील ठराव क्र. ११(१) अन्वये मंजुरी घेण्यात आली आहे. परंतु, बाजार समितीने दिवाळी निमित्त मिठाई खरेदी करतांना आवश्यक निविदा प्रक्रियेचा अवलंब केल्याचे दिसून येत नसून, सदरहू खर्चास सक्षम अधिका-यांची मंजुरीसुद्धा घेतलेली दिसून येत नाही. त्यामुळे बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतूपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास येते.

या मुद्यासंबंधाने बाजार समितीच्या संचालक मंडळाने " दिवाळी " या महत्वाचे सणानिमित्त समितीचे सर्व घटकांकरीता संचालक मंडळ, स्थाई कर्मचारी, रोजंदारी कर्मचारी, अडते, व्यापारी, हमाल, मापारी यांना मिठाई वाटप केली. यास समितीने संचालक मंडळ सभा दि. २५-११-२०१६ ठराव क्र. ११(१) अन्वये मंजुरी घेण्यात आली. त्यानुसार दि. २७ डिसेंबर २०१६ रोजी रु. २०,४२५ तसेच दि. ०२-फेब्रुवारी २०१७ रोजी रु. ५७,००० असे एकूण रु. ७७,४२५ चे बिल खर्च झालेला असून, अर्थसंकल्प शिर्षकामधील मुख्य व दुय्यम बाजार आवार खर्च शिर्षकामधील उपशिर्षक इतर खर्च या उपशिर्षका अंतर्गत खर्ची घेतले आहे. सदर शिर्षकावर एकूण रुपये अर्थसंकल्पीय मंजूर तरतूद रु. १०,००,००० मंजूर होती. यावर एकूण रुपये २१,२५,९६८ खर्च झाला असून, मंजुरीपेक्षा रु. ११,२५,९६८ जास्तीचा खर्च झालेला आहे. सदर खर्चास मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांचे दि. २६ डिसेंबर २०१९ रोजीचे पत्रान्वये मंजुरी प्राप्त झालेली असल्यामुळे, कर्तव्यपालनात हेतूपुरस्सर कसूर केल्याचे

निदर्शनास येते असे म्हणता येणार नाही. सदर खर्च नियमबाह्य नसून दिवाळी सारखा अत्यंत महत्वाचा सण असल्याने बाजार समितीचे घटक यांना मिठाई देण्यात आली. असे लेखी म्हणणे दिलेले आहे.

उक्त मुद्यासंबंधाने कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या संचालक मंडळाने दिलेल्या खुलाशाचे अवलोकन केले असता, सादर केलेला खुलासा असमाधानकारक असल्याचे दिसून येते. दिवाळी सणानिमित्त मिठाई खरेदी करताना आवश्यक निविदा प्रक्रियेचा अवलंब करणे आवश्यक होते. तसेच, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी दिलेल्या मंजुरीच्या मर्यादेच्या अधीन राहून, खर्च करणे आवश्यक होते. परंतु बाजार समितीच्या संचालक मंडळाने उक्त मंजुरीचे पालन न करता, जादा खर्च केल्याचे दिसून येते आणि खुलाशात नमूद केल्याप्रमाणे प्रलंबित कालावधीनंतर कार्योत्तर मंजुरी घेतली आहे. याचाच अर्थ असा की योग्य निविदा प्रक्रियेचा अवलंब न करता व्यवहारातील रक्कमा इतरत्र वापरल्या व म्हणून मर्यादेपेक्षा जास्त खर्च झाला. त्यामुळे बाजार समितीचे संचालक मंडळाने उक्त निविदा प्रक्रियेचे पालन करण्यात व पणन कायद्यातील कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतूपुरस्सर कसूर केल्याचे स्पष्ट होते.

**मुद्दा क्र. ४ :** ज्याअर्थी, बाजार समितीने कॅलेंडर छपाईसाठी महालक्ष्मी प्रिंटर्स, नागपूर यांना अदा केलेली रक्कम रु. ३,३९,२५३ चा खर्चामुळे बाजार समितीच्या निधीचा दुरूपयोग झाला. चौकशी अधिकारी यांनी त्यांचे अहवालात असे नमूद केले की, कृषि उत्पन्न बाजार समितीने समिती सभा दि. २५ नोव्हेंबर २०१६ मधील ठराव क्र. १० नुसार बाजार समिती कार्यक्षेत्रातील शेतकरी बांधवांना शुभेच्छा देण्याकरीता व बाजार समितीमध्ये राबविण्यात येणा-या योजनांचा प्रचार व प्रसिद्धी मिळावी याकरीता बाजार समितीने कॅलेंडर छपाई केली असून, शेतक-यांना कॅलेंडर वाटप केलेले असून, सदरहू खर्च हा बाजार समितीच्या फंडातून करण्यात आला आहे. परंतु सदरहू खर्चास सक्षम अधिकारी यांची मंजुरी घेतलेली नाही. त्यामुळे सदरहू खर्च हा नियमानुसार करण्यात आलेला नसून, बाजार निधीचा बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतूपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास येते.

सदर मुद्यासंबंधाने कृषि उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या संचालक मंडळाने समितीचे तुमसर व मोहाडी तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य तसेच ग्रामपंचायतचे सरपंच, उपसंरपंच व सदस्य त्याचप्रमाणे मार्केट यार्डवरील अडते/व्यापारी, हमाल मापारी व शेतकरी बांधवाकरीता महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ (आय) शेतकीच्या सुधारणेसाठी आणि सुव्यवस्थीत खरेदी विक्रीसाठी प्रचार व प्रसार करणेकरीता समिती माध्यमातून संचालक मंडळाचे सभा दिनांक २५-११-२०१६ मधील ठराव क्र १० नुसार बाजार समिती कार्यक्षेत्रातील शेतकरी बांधवांना शुभेच्छा देण्याकरीता व बाजार समितीमध्ये राबविण्यात येणा-या योजना लोकाभिमुख योजनेअंतर्गत गोठा जळाल्यास सर्पदंशाने शेतक-याचा मृत्यु झाल्यास त्यांना समितीकडून आर्थिक मदत देण्यात येते, तसेच शेतमाल तारण कर्ज योजनेची प्रचार व प्रसिद्धी व्हावी याकरीता ९००० नग कॅलेडर व डाय-या छपाई करून, वाटप करण्यात आलेले असून, याबाबत निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. ज्या निविदेची कमी किंमत होती. त्यांना ऑर्डर देण्यात आले. यावर रु. ३,२८,६०० खर्च झालेला आहे. सदर खर्च इतर मुख्य दुय्यम बाजार खर्च या उपशिर्षक अंतर्गत खर्ची घालण्यात आलेला आहे. यामध्ये मूळ अर्थसंकल्पामध्ये रु. १० लाखाची मंजूरी प्राप्त असून, या शिर्षकावर रु २१,२५,९६८ सदर झालेल्या जास्तीच्या खर्चास मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांचे दिनांक २६ डिसेंबर २०१९ रोजीचे पत्रान्वये मंजुरी प्राप्त असल्यामुळे कर्तव्यपालनात हेतूपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास येते असे म्हणता येणार नाही. असा लेखी खुलासा सादर केलेला आहे.

उक्त मुद्याबाबत कृषि उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने दिलेल्या लेखी खुलाशाचे अवलोकन केले असता, कॅलेंडर छपाई या बाबीवर अतिरीक्त खर्चाला महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी मंजुरी दिली असली, तरी कॅलेंडर व डाय-या छपाई करताना आवश्यक निविदा प्रक्रीयेचा अवलंब करणे आवश्यक होते. तसेच, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांनी मंजुरी दिलेल्या तरतुदीच्या अधीन राहून खर्च करणे आवश्यक होते. परंतु, मंजूर तरतुदीपेक्षा जादाचा खर्च करणे व त्यास नंतर कार्योत्तर मंजुरी घेणे ही बाब संयुक्तिक वाटत नाही. यावरून सदर बाजार समितीचे संचालक मंडळ त्यांना सोपविलेली जबाबदारी पार पाडण्यास जाणीवपूर्वक कसूर केल्याचे स्पष्ट होत असून, यामुळे पणन कायद्यातील कलम ३७ चे कर्तव्यपालनात हेतूपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास येते.

**मुद्दा क्रं. ०५:**-ज्याअर्थी, बाजार समितीने सन २०१६-२०१७ या वर्षामध्ये मंजूर अंदाजपत्रकापेक्षा जास्त खर्च भूमी विकास खर्चाकरीता केलेला आहे. बाजार समितीच्या अभिलेखानुसार सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता रु. २,००,००० ची तरतूद मंजूर असून बाजार समितीने सदर वर्षी भूमी विकसन या लेखाशिर्षाखाली रु. २,९२,८५० खर्च केलेला आहे. त्या संबंधाने संपूर्ण देयके बाजार समितीच्या रेकॉर्डला उपलब्ध आहे. परंतु, सदर खर्चाला सक्षम अधिका-याची कलम १२(१) अन्वये परवानगी घेतली नसल्याचे दिसून येते व मंजूर अंदाजपत्रकापेक्षा जादाचा खर्च केल्याचे दिसून येते. यावरुन बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम १२(१) व ३७ चे कर्तव्यपालनात हेतूपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास येते.

उक्त मुद्यासंबंधाने बाजार समितीने सन २०१६-१७ चे मूळ अर्थसंकल्पात भूमि विकसन कामे अंतर्गत रु. २ लाखाची मंजुरी प्राप्त असून, सदर वर्षी रु २,९२,८५० खर्च झालेला आहे मंजूर तरतुदीपेक्षा रुपये ९२,८५० जास्त खर्च झालेला असून समितीचे मार्केट यार्डवर व मवेशी बाजारात पावसाळ्यात अति पावसामुळे व चारचाकी वाहनामुळे ठिकठिकाणी खड्डे पडलेले होते. सदर खड्ड्यात बोल्डर व मुरुम घालून खड्डे बुजविण्यात आले. जेणेकरून

हंगामात आवागमन सुरळीतपणे करणे गरजेचे होते. सदर झालेला खर्च अत्यावश्यक असल्यामुळे मंजूर तरतुदीपेक्षा रु. ९२,८५० जास्त झालेला आहे सदर जास्तीचे खर्चाबद्दल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था भंडारा यांचे कार्यालयाने दिनांक २२-४-२०२० अन्वये वसुलीचे पत्र प्राप्त झालेले आहे. यावर मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे कलम ५२ (ब) अंतर्गत अपील दाखल केली आहे. असा खुलासा कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने सादर केलेला आहे.

सदरहू मुद्याबाबत कृषि उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने दिलेला लेखी खुलासा असामाधानकारक असून, बाजार समितीला सन २०१६-१७ या वर्षात मंजूर केलेल्या अंदाजपत्रकात नमूद केल्यानुसार भूमी विकसन कामावर विहीत मर्यादेत खर्च करणे आवश्यक होते. परंतु, प्रत्यक्षात बाजार समितीच्या संचालक मंडळाने रु. ९२,८५० जास्तीचा खर्च केलेला आहे. तसेच, सदर खर्च हा भांडवली स्वरूपाचा खर्च असल्यामुळे सदर खर्च करण्यापूर्वी कलम १२(१) नुसार पुर्वपरवानगी घेवून खर्च करणे आवश्यक होते. तसेच, सदर खर्चाला महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांनी अद्यापही मंजूरी दिलेली नाही. यावरून सदर बाजार समितीचे विद्यमान संचालक पणन कायद्यातील कलम १२(१) व कलम ३७ च्या तरतुदीचे पालन करण्यात कसूर करीत असल्याचे स्पष्टपणे निदर्शनास येते.

**मुद्दा क्रं. ०६:**–ज्याअर्थी, ओपन ओट्यावरील ६ रनिंग बिल झालेले असून, सदर बिलाची एकूण रक्कम रु. ८५,४५,८४७ इतकी असून, कंत्राटदाराला रु. ८७,१२,७६८ इतकी रक्कम देण्यात आलेली आहे. यावरून बाजार समितीने कंत्राटदाराला रक्कम रु. १,६६,९२१ इतकी रक्कम जास्त दिलेली आहे. याबाबत लेखापरीक्षक यांनी आक्षेप नोंदविला असून, सदर आक्षेप लेखापरीक्षकाच्या अभिप्रायामध्ये कायम आहे. वरील बांधकाम खर्चाला सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी नसताना कंत्राटदाराला जादाची रक्कम दिल्याचे दिसून येते. तसेच, सिमेंट कॉंक्रीट रोडचे इस्टीमेटमध्ये ॲटम क्रमांक ३ मध्ये टि.एम.टि. स्टिल बार ची किंमत बांधकाम विभागाचे डिएस.आर. नुसार दर रु. ५४,५३० असून सदरची Quantity २४.४४ टन स्टिल आहे. त्याची एकूण बेरीज रु. १३,३२,७१३ असताना इस्टीमेट मध्ये त्याचा दर रु ५६,६८० नमूद करून त्याची रक्कम रु १३,३६,३७९ इस्टीमेट मध्ये दाखविण्यात आलेली आहे. रक्कम रु, ३,६६६ इस्टीमेटमध्ये जादाची रक्कम दाखविण्यात आली असून, सदर रक्कमेवर १९.९८ व्याज लावण्यात आलेला असून सदर व्याज हा रु. ७३२ येत आहे. जादाची रक्कम रु. ३,६६६ + व्याज रु. ७३२ = ४,३९८ कंत्राटदाराला रु. ४३९८ जादाचे देण्यात आले आहे. जादा दराने रक्कम अदा करण्याबाबत बाजार समिती खुलासा सादर करू शकलेली नाही.

वरीलप्रमाणे एकंदरीत रक्कम रु, १,६६,९२१ + रु. ४,३९८ = १,७१,३१९ कंत्राटदाराला जादाचे देण्यात आलेले आहेत, त्यामुळे बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम १२(१) व ३७ चे कर्तव्यपालनात हेतूपुरस्सर कसूर केल्याचे निदर्शनास येते.

उक्त मुद्यासंबंधाने बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने खालीलप्रमाणे खुलासा सादर केलेला असून, समितीचे मार्केट यार्डवर प्रशासकीय इमारतीच्या मागील भागात ओपन ओट्यावर शेड बांधकाम करण्यात आले आहे. या बांधकामाचे सन २०१७-१८ अखेर पर्यंत एकूण ५ रनिंग बिल रु. ८५, ४५, ८४७ कंत्राटदारास अदा केले आहे. कंत्राटदाराला रु. १,६६,९२१ इतकी रक्कम जास्तीचे अदा करण्यात आलेली नाही. त्यामुळे रु. १,६६,९२१ रक्कम वसुलीस पात्र नाही. सिमेंट कॉंक्रीट रोडचे इस्टीमेटमध्ये ॲटम क्रं. ३ मध्ये टि.एम.टी.बार ची किंमत बांधकाम विभागाचे डी.एस.आर. नुसार दर रु ५४,५३० असून सदरची क्वॉंटीटी २४.४४ टन स्टील आहे. त्याची एकूण बेरीज रु. १३,३२,७१३ असताना इस्टीमेटमध्ये त्याचा दर रु, ५४,६८० नमूद करून, त्याची रक्कम रु १३,३६,३७९ इस्टीमेटमध्ये दाखविण्यात आलेली आहे. याबाबत समितीचे आर्किटेक्ट यांचेकडून खुलासा मागवून त्यामध्ये आर्किटेक्ट यांनी रु ५४,५३० ऐवजी रु, ५४,६८० यामध्ये प्रिंट मिस्टेक झालेला आहे, असे कळविले आहे. सदर बांधकामाचे रु. ४,३९८ कंत्राटदाराचे सिक्युरीटी रक्कमेमधून दिनांक १६ जानेवारी २०२० अन्वये रु. ४,३९८ वसूल करण्यात आले आहे.

उक्त मुद्याबाबत बाजार समितीच्या संचालक मंडळाने दिलेला लेखी खुलासा नुसार कंत्राटदाराची निविदा मंजूर केल्यानंतर कंत्राटदारास मंजूर निविदेपेक्षा दिलेली जादाची रक्कम वसूल झाली असल्यामुळे, बाजार समितीचा खुलासा मान्य करण्यात येत असून, सदर मुद्दा वगळण्यात येत आहे.

**मुद्दा क्रं. ०७:**–ज्याअर्थी, बाजार समितीने ओपन ओट्यावरील शेडचे बांधकामाकरीता मंजूर इस्टीमेटपेक्षा रक्कम रु. ८,६२,६८९ चे जादाचे बांधकाम केलेले आहे. तसेच सिमेंट कॉंक्रीट रोड करीता रु. १,५०,४८९ चे जादाचे बांधकाम केलेले आहे. सदर वाढीव बांधकामांस कृषी पणन मंडळ, पुणे यांची परवानगी नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे बाजार समितीने महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कलम १२(१) अन्वये दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्याचे दिसून येते.

सदर मुद्यासंबंधाने बाजार समितीमध्ये ओपन ओट्यावरील शेड बांधकामाकरीता मंजूर इस्टीमेटपेक्षा रक्कम रु. ८,६२,६८९ तसेच सिमेंट कॉंक्रीट रोड बांधकामाचे रक्कम रु. १,५०,४८९ वाढीव देयकास महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांची १२(१) अन्वये दिनांक १३ जुलै २०२० नुसार मंजुरी प्राप्त झालेली आहे. असा खुलासा बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने सादर केलेला आहे.

उक्त मुद्याबाबत बाजार समितीच्या संचालक मंडळाने दिलेला लेखी खुलासा समाधानकारक असून, बांधकामात झालेल्या जादाच्या खर्चास महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी मंजुरी दिली असल्यामुळे, सदरहू मुद्दा यास्तरावर वगळण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. ०८:–**ज्याअर्थी, संचालक मंडळ सभा दिनांक ५ ऑक्टोबर २०१८ ठराव क्रमांक १२ नुसार समितीचे प्रशासकीय मिटींग हॉल व अडते/व्यापारी गृहाचे बांधकाम व दुरूस्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार समितीचे आर्किटेक्ट श्री. सुरज पशिने यांनी (१) फॉल्स सिलींग, मिटींग डेस्क आणि एस.एस.स्टिल चेअर आणि ॲडमिनीस्ट्रेटीव्ह इमारत आणि एजंट रेस्ट हाऊस रु. २,९०,१५० (२) मिटींग हॉल दुरूस्ती आणि ट्रडर्स रूम दुरूस्ती रु २,९१,६०० असे एकूण रु, ५,८१,७५० इस्टीमेट सादर केले होते. सदर दोन्ही कामांना मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांचे मंजुरी आदेश क्र.जिनिभं/कृउबास/१२(१)/९१२६/२०१६, दिनांक १ डिसेंबर २०१६ नुसार वरील दोन्ही कामांना एकूण ९ अटींच्या अधीन राहून मंजुरी देण्यात आलेली आहे. संस्थेच्या ठरावानुसार सदर दोन्ही कामांपैकी १ काम प्रेरणा मजूर सहकारी संस्था मर्या. सिहोरा व १ काम शारदा मजूर सहकारी संस्था मर्या. तुमसर या संस्थांना देण्यात आलेले होते. परंतु, दोन्ही कामे प्रेरणा मजूर सहकारी संस्था मर्या., सिहोरा या संस्थेनेच पूर्ण कसे काय केलीत ही संशयास्पद बाब आहे. सदर दोन्ही कामे मुदतीत पूर्ण झाले अथवा नाही. याबाबत बाजार समितीकडून माहिती मिळू शकली नाही.

तसेच, वरील दोन्ही काम रक्कम रु ३ लाखाच्या आतील असले व मजूर सहकारी संस्थेला काम दिले, तरी सदर कामाबाबत समितीने निवीदा काढणे गरजेचे होते परंतु समितीने तसे केल्याचे दिसून येत नाही, जरी रु. ३.०० लाखाचे आतील काम असल्याने व जिल्हास्तरीय समितीने वाटप केलेले नसल्याने बाजार समितीने या कार्यालयाला मजूर संस्थांकडून काम करीत असल्याचे कळविणे आवश्यक होते. यावरुन सदरहू बाजार समितीचे संचालक मंडळाने या कार्यालयाचे आदेशातील अटीचे उल्लंघन केल्याचे दिसून येते व समितीच्या ठरावाचे स्वतःच उल्लघंन केल्याचे स्पष्टपणे निदर्शनास येते यावरुन बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम १२(१) व ३७ चे कर्तव्यपालनात हेतूपुरस्सर कसूर केल्याचे दिसून येते

या मुद्यासंबंधाने समितीचे मुख्य कार्यालयीन प्रशासकीय मिटींग हॉल व अडते, व्यापारी गृहाचे दुरूस्तीचे काम करण्याचा निर्णय संचालक मंडळाचे सभा दि. ५ ऑक्टोबर २०१६, ठराव क्र. १२ अन्वये बांधकाम करण्याचे निर्णय घेण्यात आला सदर बांधकामास मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, भंडारा यांचे दिनाक १ डिसेंबर २०१६ नुसार मंजुरी प्रदान करण्यात आली यानुसार सदर बांधकाम विश्रामगृहाकरीता लागणारे साहित्य मिटींग डेस्क व एस.एस स्टील चेअर्स पुरवठा करण्याचे काम रु २४,५६,६०० चे शारदा मजूर सहकारी संस्था, भंडारा, जिल्हा मजूर सहकारी संघ, भंडारा यांनी त्यांचे पत्र क्रं १६०९, दिनांक २८-१२-२०१६ तसेच अडते, व्यापारी विश्रामगृहाचे विशेष दुरूस्ती करण्याचे काम रु. २,४५,४५० चे पत्र क्र. १६१२, दिनांक २८ डिसेंबर २०१६ अन्वये शिफारस पत्र दिले होते. त्यानुसार दोन्ही मजूर संस्थांना इस्टीमेट रेटवर कामे देण्यात आले, परंतु शारदा मजूर सहकारी संस्था यांनी काम करण्यास दिनांक २५ जानेवारी २०१७ रोजीचे पत्रानुसार नकार दिला. त्यामुळे सिलींग मिटीग डेस्क व एस.एस. स्टील चेअरचे पुरवठा करण्याचे रु, २,४५,६०० काम प्रेरणा मजूर संस्थेला देण्यात आले आणि शासन निर्णयाप्रमाणे कामकाज करण्यात आले. असा लेखी खुलासा बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने दिलेला आहे

सदर मुद्याबाबत बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने दिलेल्या लेखी खुलासाचे अवलोकन केले असता मुद्यात नमूद बांधकामाकरीता या कार्यालयाचे कामवाटप समितीमध्ये मंजूर केलेल्या मजूर सहकारी संस्थेकडून काम करून घेणे अपेक्षित होते, परंतु शारदा मंजूर सहकारी संस्थेने सदर काम करण्यास नकार दिल्यानंतर ते काम दुस-या मजूर सहकारी संस्थेकडून करून घेण्यापूर्वी या कार्यालयास कळवून काम वाटप समितीची मंजूरी घेवून करणे अपेक्षीत होते. परंतु, सदर बाजार समितीचे संचालक मंडळाने या कार्यालयाचे स्तरावरून काम वाटप समितीची पूर्व परवानगी न घेता स्वतःचे अधिकारात सदर काम अन्य मजूर सहकारी संस्थेकडून करून घेतले आहे. यावरुन सदर बाजार समितीचे संचालक मंडळाने या कार्यालयाचे स्तरावरील काम वाटप समितीने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट होत आहे.

**मुद्दा क्र. ०९:–**ज्याअर्थी, बाजार समिती उपविधी क्रमांक १६ (३) व (४) नुसार बाजार फी व देखरेख फी शेतमालाचे वजन किंवा मोजणी झाल्यानंतर ताबडतोब भरणे बंधनकारक असतात व अशी बाजार फी भरण्यास ज्या व्यापारी/अडते, खरेदीदार, प्रक्रिया करणारे यांनी कसूर केल्यास द.सा.द.शे १२% या दराने दंडासहित बाजार फी वसूल करण्याचे अधिकार बाजार समितीस राहील, अशी स्पष्ट तरतूद असतांना ज्या व्यापारी/अडते खरेदीदार, प्रक्रिया करणारे यांनी बाजार फी व देखरेख फी ही १ किंवा २ महिण्यात किंवा त्यापेक्षाही जास्त महिन्यात बाजार समितीला दिली नाही ही वस्तुस्थिती आहे बाजार समितीने जे व्यापारी/अडते खरेदीदार, प्रक्रिया करणारे याच्यावर कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे व्यापारी/अडते, खरेदीदार, प्रक्रिया करणारे यांचेकडून वेळीच बाजार फी व देखरेख फी वसूल न झाल्यामूळे बाजार समितीचे दंड व्याजाच्या स्वरूपात येणा-या रक्कमेचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे बाजार समितीचे संचालक मंडळ हे महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्या अंतर्गतचे नियम व पोटनियमाने त्यांचेवर सोपविलेल्या जबाबदारीचे पालन करण्यास जाणून बुजून कसूर करीत असल्याचे दिसून येते.

या मुद्यासंबंधाने समितीचे मार्केट यार्डवर शेतक-यांनी शेतमाल विक्रीकरीता आणल्यानंतर समितीच्या मार्केट यार्डवर खरेदी विक्रीचे व्यवहार होत असतो. शेतक-याचे शेतमालाचे विक्री झाल्यानंतर प्रत्येक शेतमालाची सौदापट्टी मार्केट यार्डवरील कार्यालयात अडत्या मार्फत तयार करण्यात

येते. तसेच हंगामामध्ये रात्री उशिरापर्यंत मार्केट यार्डवर वजनमापाचे कार्य होत असतात. त्यानंतर काटापट्टी तयार करण्यात येते. काटापट्टी शेतकरी अडत्याकडे नेतो त्यांनतर अडत्या चुकारा देतो व व्यापा-याकडे चुकारा मागणीची बिल पट्टी तयार करून देतो. ही प्रक्रीया पार पाडल्यानंतर अडते समितीचे मार्केट यार्डवर हिशोबपाट्या व बिल पाट्या बुक निहाय देतात, मुख्य कार्यालयात सदर महिन्यातील प्राप्त झालेल्या बिल पाट्या खरेदीवर यांचे खात्यावर स्वतंत्रपणे खतावणी करण्यात येते. व्यापा-यांनी खरेदी केलेल्या एकूण शेतमालावरील बाजार फी व सुपरव्हीजन फी चे महिनावार विवरण तयार होवून त्यांचेकडून बाजार फी व सुपरव्हीजन फी लगेच वसूल करण्यात येते ज्या व्यापा-यांकडून बाजार फी व सुपरव्हीजन फी वसूल झाले नाही त्या व्यापा-याचे कलम ५७ अंतर्गत मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था तुमसर यांचेकडे प्रकरण दाखल करण्यात आले आहे. तसेच हि फार पुर्वीपासून प्रचलित प्रथा आहे. असा लेखी खुलासा बाजार समितीच्या संचालक मंडळाने दिलेला आहे.

सदरहू मुद्याबाबत बाजार समितीच्या संचालक मंडळाने सादर केलेल्या खुलासाचे अवलोकन केले असता बाजार समितीचे मार्केट यार्डवर खरेदी-विक्री होणा-या शेतमालावर आकारलेली बाजार फी व देखरेख फी शेतमालाचे वजन किंवा मोजणी झाल्यानंतर ताबडतोब वसूल होणे पणन कायद्यानुसार आवश्यक असतांना बाजार समितीने सदरची बाजार फी व देखरेख फी वेळेत वसूल केलेली नाही किंवा या करीता ठोस प्रयत्न केल्याचे निदर्शनास येत नाही व त्यामुळे कलम ५७ अंतर्गत प्राधिकरण नियुक्त करण्याची कार्यवाही करावी लागली. त्यामुळे बाजार समितीचे संचालक मंडळाने पणन कायदा व बाजार समितीचे उपविधीतील तरतुदीचे पालन करण्यात हेतुपुरस्पर कसूर केल्याचे दिसून येत आहे.

**मुद्दा क्र. १०:–**ज्याअर्थी, सन २०१२-२०१३ पासून जिल्हा मार्केटींग अधिकारी, भंडारा यांच्याकडून येणे असलेली बाजार फी व देखरेख खर्चाची रक्कम रु. १,०६,१७,१९१ वसुल करण्यात आलेली नाही. तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडील बाजार फी व देखरेख फी खर्च रक्कम रु. ४,३०,८८४ व तालुका मोहाडी येथील अनुज्ञाप्तीधारक व्यापा-याकडून येणे असलेली बाजार फी व देखरेख फी रक्कम अद्यापही वसूल करण्यात आलेली नाही तसेच त्यांची अनुज्ञाप्ती देखील रद्द करण्यात आलेली नाही. तसेच सदर रक्कम वसूल करण्यास बाजार समितीच्या संचालक मंडळाने ठोस प्रयत्न केले नसल्याचे दिसून येते, त्यामुळे बाजार समितीच्या संचालक मंडळाने महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्या अंतर्गतचे नियमातील तरतुदीचे पालन करण्यास कसूर करीत असल्याचे दिसून येते.

सदर मुद्यासंबंधाने बाजार समितीच्या संचालक मंडळाने पुढील प्रमाणे खुलासा सादर केलेला आहे. मा. जिल्हा मार्केटींग अधिकारी, शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेल्या धानावरील बाजार फी व सुपरव्हीजन फी मिळण्याबाबत मा. कार्यकारी संचालक, दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑप फेडरेशन लि. मुंबई तसेच मा. जिल्हा मार्केटींग अधिकारी, भंडारा यांचेकडे बाजार फी व सुपरव्हीजन फी वसुली बाबत वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्यापैकी सन २०१३-१४ या वर्षातील धान खरेदी घोटाळयामुळे सेस प्रलंबित आहेत. तसेच सन २०१६-१७ मधील सेस रु. ४५,५५,४४९ प्राप्त झाले आहे. उर्वरीत सेस मिळण्यासंबंधाने पाठपुरावा करण्यात आलेला आहे. तसेच मा. जिल्हा पुरवठा अधिकारी, भंडारा यांचेकडे समितीला घेणे असलेली स्वस्त धान्य दुकानदारांकडून बाजार फी व सुपरव्हीजन फी बाबत पत्रव्यवहार करून, वारंवार मागणी करण्यात येत असून, सदर प्रकरण मा. जिल्हा पुरवठा अधिकारी, भंडारा यांचेकडून शिफारस करून मा. आयुक्त यांचेकडे पाठविण्यात आलेले असून, प्रकरण प्रलंबित आहे.

सदरहू मुद्याबाबत बाजार समितीने दिलेल्या खुलासाचे अवलोकन केले असता, शासकीय आधारभूत धान खरेदी योजनेअंतर्गत बाजार समितीचे आवार क्षेत्रात खरेदी झालेल्या धानापोटी बाजार समितीला मिळणारी बाजार फी व देखरेख खर्च शासनाकडून येणे प्रलंबित असल्याने, बाजार समितीचा खुलासा मान्य करण्यात येत असून, सदरहू मुद्दा वगळण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. ११ :** ज्याअर्थी, बाजार समितीने आवारात काम करण्याकरीता एकूण २९ व्यक्तीची हंगामी कर्मचारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. सदरहू हंगामी कर्मचारी यांची ६ महिनेपेक्षा जास्त कालावधीकरीता नियुक्ती करतांना उक्त कायद्यातील नियम, १००(५) नुसार सक्षम अधिका-यांची परवानगी घेतलेली नाही व त्यांना सहा महिने पेक्षा जास्त दिवस पर्यंत रोजंदारीवर कायम ठेवल्याने सदर हंगामी कर्मचारी यांनी औद्योगिक न्यायालय, भंडारा येथे दावे दाखल कलेले आहेत. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे बाजार समितीच्या संचालक मंडळाने महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे नियम १००(५) चे कर्तव्यपालनात व मा. पणन संचालक, पणन संचालनालय, म. रा., पुणे यांचे परिपत्रकीय सूचनांचे पालन करण्यास कसूर केल्याचे दिसून येते.

उक्त मुद्यासंबंधाने बाजार समितीमध्ये काम करणा-या २९ कर्मचा-यांपैकी १० कर्मचारी यांचे न्यायालय, भंडारा येथे ULP No. ४६/२०२० ते ५६/२०२० मध्ये याचिका दाखल केली होती. ती मा. औद्योगिक न्यायालयाने खारीज केलेली आहे. त्याप्रमाणे मा. कामगार न्यायालय, भंडारा येथे ID No. ९/२०१३ ते २१/२०१३ असून मा. कामगार न्यायालय, भंडारा यांनी सुद्धा याचिका खारीज केलेली आहे. यापैकी ३ कर्मचारी २ ते ३ वर्षापासून सतत गैरहजर आहेत. तसेच उर्वरीत ११ कर्मचारी व मार्केट यार्ड झाळझुळ, साफसफाई करण्याकरीता अर्धावेळ ठेवण्यात येते.

मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांची स्टेटस्को आदेशाची झेरॉक्स प्रत. अशा प्रकारचा खुलासा कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने सादर केलेला आहे.

सदरहू खुलासाचे अवलोकन केले असता, बाजार समितीचे कार्यक्षेत्रातील मार्केट यार्डवर काम करण्याकरीता रोजंदारी कर्मचा-यांची नियुक्ती करतांना पणन कायद्यातील नियम १००(५) नुसार सक्षम अधिका-याची मंजुरी घेतलेली नसल्याचे सिद्ध होत आहे. त्यामुळे सदरहू खुलासा अमान्य करण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. १२ :** ज्याअर्थी, आधारभूत धान खरेदी योजनेअंतर्गत तुमसर व मोहाडी तालुक्यातील धान खरेदी केंद्राना जोडून देणे, टोकन देणे, ताडपत्री पुरवठा करणे, शेतक-यांसाठी पाण्याची व्यवस्था करणे, आद्रर्ता मापक यंत्र पुरवठा करणे ही जबाबदारी बाजार समितीची आहे. ही वस्तुस्थिती आहे. परंतू आधारभूत धान खरेदी केंद्रांना गावे जोडतांना वारंवार गावे जोडणे तसेच कालांतराने मनमर्जीने गावे इतरत्र जोडणे. यामुळे शेतक-यांना होणा-या त्रासापाई अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. यामुळे शेतक-यांना विनाकारण या केंद्रावरून त्या केंद्रावर भटकंती करावी लागत आहे. तसेच मोहाडी तालुक्यातील केंद्राबाबत ब-याच तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे. यावरून सदरहू बाजार समितीचे संचालक मंडळाला महाराष्ट्र राज्य मार्केटींग फेडरेशन लि., मुंबई यांनी सोपविलेली जबाबदारी पार पाडण्यास कसूर करीत असल्याचे दिसून येते.

सदरहू मुद्याबाबत आधारभूत धान खरेदी योजनेअंतर्गत तुमसर व मोहाडी तालुक्यातील धान खरेदी केंद्रांना गावे जोडून देणे, भौतिक सुविधा पुरविणे ही कामे समितीने काळजीपूर्वक केले असून, मा. जिल्हा पणन अधिकारी, भंडारा यांनी तुमसर व मोहाडी तालुक्यात वारंवार नविन केंद्रांना मंजुरी दिल्यामुळे वारंवार त्यांचे निर्देशानुसार खरेदी केंद्रांना गावे जोडण्यात आले होते. मा. जिल्हा पणन अधिकारी, भंडारा यांनी वारंवार नव्याने शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रांना मंजुरी व गावे जोडण्याचे आदेशाचे प्रती सोबत जोडले आहे. त्यामुळे संचालक मंडळाने कसूर केल्याचे म्हणता येणार नाही. असा खुलासा कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाने दिलेला आहे.

सदरहू मुद्याबाबत बाजार समितीच्या संचालक मंडळाने दिलेला खुलासाचे वाचन केले असता, बाजार समितीचे कार्यक्षेत्रातील आधारभूत धान खरेदी केंद्रांना गावे जोडण्याबाबत जिल्हा पणन अधिकारी, भंडारा यांचे निर्देशानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत असल्यामुळे, बाजार समितीच्या संचालक मंडळाचा खुलासा मान्य करण्यात येत असून, सदरहू मुद्दा वगळण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. १३ :** ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या ई-नाम योजनेची राज्यातील ६० बाजार समित्यामध्ये अंमलबजावणी सुरू असून, भंडारा जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती तुमसर, जि. भंडारा या बाजार समितीचा समावेश करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाने शेतक-यांच्या शेतीमालाची विक्री होऊन, शेतक-यांना त्यांच्या शेतीमालाचा यथोचित भाव मिळावा व शेतक-यांना थेट त्यांच्या बँक खात्यावर पैसे मिळावे यासाठी ई-नाम ही योजना राष्ट्रीय स्तरावर राबविण्यास सुरूवात केलेली आहे. त्यानुसार सदरहू योजनेअंतर्गत बाजार समितीमध्ये येणा-या शेतमालाची इन गेट एंन्ट्री, ई-ऑक्शन, ईन गेट एन्ट्री प्रमाणे लाट तयार करणे, इन गेट एन्ट्री व त्याप्रमाणात असेइंग (प्रयोगशाळा अहवाल) करणे, ई-लिलाव करणे, ई-पेमेंट करणे व आऊट गेट एन्ट्री इत्यादी नोंदी ई-नामच्या वेबसाईटवर बाजार समितीने १००% करणे बंधनकारक केलेले आहे.

परंतु बाजार समिती अद्याप पर्यंत ई-नाम योजनेची अंमलबजावणी १००% केली नसल्याबाबत माहे ऑगस्ट २०२० या महिन्याच्या महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांचे दिनांक २३ सप्टेंबर २०२० रोजी अहवालावरून दिसून येत असून, शेतमालाची एकूण आवक व त्या प्रमाणात झालेले ई-ऑक्शन, इन गेट एंट्री व त्याप्रमाणात असेइंग झालेले लॉट, ई-लिलाव केलेले एकूण लॉट, एका लॉटसाठी एकच बिड, ई-पेमेंट कलेले लॉट इत्यादीची माहिती अहवालामध्ये असमाधानकारक असल्याचे दिसून येते. याबाबत जिल्हा उपनिबंधक यांचे अध्यक्षतेखाली बाजार समितीमध्ये अनेक बैठका घेवून व सूचना करूनही, बाजार समितीने या योजनेकडे गांभीर्यपूर्वक लक्ष केंद्रीत न केल्याने, योजनेचा उद्देश सफल होऊ शकला नाही. या योजनेबाबत बाजार समितीच्या संचालक मंडळाचे उदासीन धोरण दिसून येते. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने केंद्र शासनाच्या योजनेची अंमलबजावणी सक्षमपणे केली नाही. त्यामुळे बाजार समितीच्या संचालक मंडळावर केंद्र शासनाने ई-नाम योजनेच्या अंमलबजावणी बाबत सोपविलेली जबाबदारी व कर्तव्यात कसूर केल्याचे दिसून येते.

या मुद्याबाबत केंद्र शासनाच्या ई-नाम योजनेची अंमलबजावणी बाजार समितीमध्ये करण्यात येत असून, सदर योजनेअंतर्गत बाजार समितीमध्ये येणा-या शेतमालाची गेट एन्ट्री ई-नामच्या वेबसाईटवर बाजार समितीने केलेली आहे. परंतु कोविड-१९ च्या प्रादूर्भाव समितीचे मार्केट यार्डवर शेतमालाची आवक अल्प प्रमाणात येत होती. तसेच अडते व व्यापारी यांची उपस्थिती फारच कमी होती. त्यामुळे ई-ऑक्शन कमी प्रमाणात झाले आहे. सध्या समितीचे मार्केट यार्डवर आवक येत असून, शेतमालाची गेट एन्ट्री ई-नामच्या वेबसाईटवर करीत असून, ऑक्शन करीत आहे. असा लेखी खुलासा कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या संचालक मंडळाने दिलेला आहे.

उक्त मुद्याबाबत बाजार समितीच्या संचालक मंडळाने दिलेला खुलासा अत्यंत मोघम स्वरूपाचा व असमाधानकारक असून, केंद्र शासनाच्या ई-नाम योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी बाबत महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांचे माहे ऑगस्ट २०२० चे तसेच त्या अगोदरचे व त्यानंतरचे सुद्धा मासिक अहवालावरून कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीचे कामकाज असमाधानकारक असल्याचे निदर्शनास येत आहेत. ई-नाम योजना ही केंद्र शासनाची योजना असून सदरहू योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत कृषि उत्पन्न बाजार समिती, तुमसरच्या संचालक मंडळ यांची वारंवार सभा घेवून, मार्गदर्शन करून वेळोवळी कळवून सुद्धा सदरहू योजनेची अंमलबजावणी करण्यात बाजार समितीचे संचालक मंडळ अपयशी ठरल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे बाजार समितीच्या संचालक मंडळावर केंद्र शासनाने ई-नाम योजनेच्या अंमलबजावणीबाबत सोपविलेली जबाबदारी व कर्तव्यात कसूर केल्याचे दिसून येते.

**मुद्दा क्र. १४ :** ज्याअर्थी, भेट व समारंभ याकरीता मंजूर तरतूद रक्कम रु. १,००,००० असतांनी प्रत्यक्षात रक्कम रु. १,७८,२४५ खर्च झालेला आहे. ही वस्तुस्थिती असल्यामुळे, बाजार समितीच्या संचालक मंडळाने महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ चे कर्तव्यपालनात व मा. पणन संचालक, पणन संचालनालय, म. रा., पुणे यांचे परिपत्रकीय सूचनांचे पालन करण्यास कसूर केल्याचे दिसून येते आहे.

सदरहू मुद्याबाबत सन २०१६-१७ चे मुळ अर्थसंकल्पात भेट व समारंभ या शिर्षकावर रु. १.०० लाखाची मंजुरी प्राप्त होती. सदर खर्च समितीमध्ये भेट देणारे अधिकारी व पदाधिकारी तसेच समितीमध्ये येणारे पाहुणे यांचे आदर सत्काराकरीता चहा, पान, नास्ता व जेवणाकरीता केलेला खर्च आहे. सदर वर्षात एकूण रु. १७८२४५ खर्च झाला असून, मंजूर तरतुदीपेक्षा रु. ७८२४५ जास्तीचा खर्च झाला होता. अर्थसंकल्प शिर्षक प्रशासकीय खर्च मधील उपशिर्षक भेटी व समारंभ या उपशिर्षकामध्ये खर्ची घालण्यात आले आहे. सदर खर्चास मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांचे दि. २६ डिसेंबर २०१९ अन्वये मंजुरी प्राप्त आहे. त्यामुळे संचालक मंडळाने कसूर केल्याचे म्हणता येणार नाही. असा खुलासा बाजार समितीच्या संचालक मंडळाने सादर केलेला आहे.

या मुद्याबाबत बाजार समितीच्या संचालक मंडळाने सादर केलेल्या खुलासाचे अवलोकन केले असता, भेट व समारंभ या शिर्षकावर झालेला जादा खर्च रु. ७८,२४५ ला महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी मान्यता दिली असल्यामुळे, बाजार समितीच्या संचालक मंडळाचा खुलासा मान्य करण्यात येत असून, सदरहू मुद्दा वगळण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. १५ :** ज्याअर्थी, बाजार समितीने प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतर ६ महिन्याच्या आंत वार्षिक सर्वसाधारण सभा घेणे बंधनकारक आहे. परंतु बाजार समितीने सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा मुदतीत घेतली नाही, ही वस्तुस्थिती आहे. यावरून बाजार समितीचे संचालक मंडळ पणन कायदा व उपविधीनुसार त्यांना सोपविलेली जबाबदारी पार पाडण्यास कसूर करीत असल्याचे दिसून येते.

सदरहू मुद्याबाबत कृषि उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या संचालक मंडळाने समितीचे आर्थिक वर्ष संपल्यानंतर सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा दरवर्षीप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे संचालक मंडळाने कसूर केल्याचे म्हणता येणार नाही, असे लेखी म्हणणे दिलेले आहे.

उक्त मुद्याबाबत बाजार समितीने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून तो अमान्य करण्यात येत आहे. कारण की, कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम २७-अ अन्वये बाजार समितीने प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरनंतर सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये तिच्या सदस्यांची वार्षिक सर्वसाधारण सभा घेणे आवश्यक आहे. परंतु सदर बाजार समितीने उक्त कायद्यातील तरतुदीनुसार विहित मुदतीत वार्षिक सर्वसाधारण सभा घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या संचालक मंडळाने पणन कायद्यातील कलम २७-अ मधील तरतुदींचे पालन करण्यात कसूर केल्याचे दिसून येत आहे.

ज्याअर्थी, पणन कायद्यातील उक्त कलमांतर्गत जिल्हा उपनिबंधक यांनी बजावलेल्या कारणे दाखवा नोटीसीतील मुद्दे, आक्षेपावर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळाने सादर केलेले म्हणणे, खुलासा, कागदपत्रे व त्यावर जिल्हा उपनिबंधक यंचे अभिप्राय या बाबींचा विचार करून, सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे चे संचालक मंडळाचे सभेपुढे विचारविनिमयासाठी सादर केला जातो व सभेतील निर्णयानुसार सदर कारणे दाखवा नोटीसीवर मंडळाचे अभिप्राय कळविण्यात येतात अशी तरतूद असल्याने वाचावे क्र. (७) नुसार महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी कारणे दाखवा नोटीसीतील मुद्यांच्या अनुषंगाने अंतिम सुनावणी झाल्यानंतर जिल्हा उपनिबंधक यांचे अभिप्राय सादर करणेबाबत कळविण्यात आले. त्यानुसार या कार्यालयाचे वाचावे क्र. (८) नुसार उक्त कारणे दाखवा नोटीसी संबंधाने अंतिम सुनावणी पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य कृषी

पणन मंडळ, पुणे यांचे संचालक मंडळ सभेसमोर विचारविनिमयाकरीता या कार्यालयाचे लेखी अभिप्राय व बाजार समितीच्या संचालक मंडळाचे म्हणणे सादर करण्यात आले आहेत.

ज्याअर्थी, वाचावे क्र. (९) नुसार महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी दि. १२ ऑगस्ट २०२१ रोजी पणन मंडळाच्या संचालक मंडळाची सभा क्र. १४६ आयोजित केली.   सदरहू सुनावणीस कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या संचालक मंडळास कलम ४५(१) अन्वये बजावलेल्या कारणे दाखवा नोटीसी संबंधाने बाजार समितीच्या संचालक मंडळाने सादर केलेले खुलासे, रोजनामा, सुनावणीमध्ये सादर केलेली सर्व कागदपत्रे व दस्तऐवज सभेवेळी विचारविनिमयाकरीता सादर करण्यात आले.   त्यानुसार वाचावे क्र. (१०) अन्वये महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी पणन मंडळाच्या दि. १२ ऑगस्ट २०२१ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र. ४ ची प्रत या कार्यालयास पाठविलेली आहे.   सदरहू पत्राचे व ठरावाचे अवलोकन केले असता, या कार्यालयाने "कृषि उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळावर बजावलेली वाचावे क्र. (६) च्या कारणे दाखवा नोटीसीतील मुद्दा क्र. ६, ७, १०, १२, १४ व १५ हे सहा मुद्दे सोडून मुद्दा क्र. १, २, ३, ४, ५, ८, ९, ११ व १३ या मुद्यांमधील दोष पाहता बाजार समितीचे विद्यमान संचालक मंडळाने त्यांचे कायदेशीर कर्तव्यात कसूर केल्याबाबत जबाबदार असल्याचे निष्पन्न होत असल्याने, ते कार्यवाहीस पात्र आहेत.   त्यामुळे जिल्हा उपनिबंधकांनी कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर जि. भंडाराचे विद्यमान संचालक मंडळ यांचेविरूद्ध कलम ४५(१) अन्वये प्रस्तावित  केलेल्या कारवाईस पणन मंडळ सहमत आहे."   असे नमूद केलेले आहे.   त्यानुसार पणन कायद्यातील तरतुदीनुसार पणन मंडळाशी विचार-विनिमय करण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त मुद्दा क्र. १, २, ३, ४, ५, ८, ९, ११, १३ व १५ चे विवेचन विचारात घेता ज्यावेळी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४५(१) अंतर्गत कारणे दाखवा नोटीस कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाला बजावण्यात आली.   त्यावेळी बाजार समितीचे विद्यमान संचालक मंडळ यांनी जाणिवपूर्वक व हेतुपुरस्सरपणे कायदा, नियम, शासन निर्णय व परिपत्रकीय सूचना/निर्देश, तसेच बाजार समिती उपविधी यांचे उल्लंघन केल्याचे तसेच सदरहू बाजार समितीचे विद्यमान संचालक मंडळ त्यांचेकडे सोपविलेली जबाबदारी व कर्तव्य पार पाडण्यात उक्त नमूद केलेल्या विवेचनानुसार स्पष्ट होत असल्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीचे विद्यमान संचालक मंडळ अधिक्रमण करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

क्रमाक जिउनि-भं-पणन-कृउबास-तु-कलम ४५(१)-अंतिम आदेश-२५७३-२०२१.—

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्याअंतर्गतचे नियम, १९६७ व मा. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. सीएमआर-आर-ॲक्ट-रूल-८१, दि. १८ सप्टेंबर १९८१ अन्वये निम्न स्वाक्षरीकारास प्राप्त अधिकारानुसार मी, एम. एम. देशकर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा उपरोक्त विवेचनास अधिन राहून, कृषि उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीचे विद्यमान संचालक मंडळ कलम ४५(१) मधील तरतुदीनुसार  अधिक्रमित करीत असून, त्या जागी कलम ४५(२)(क) मधील तरतुदीनुसार श्री. आर. सी. चोरघडे, सहकार अधिकारी श्रेणी-१, अंतर्गत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका तुमसर यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.   याद्वारे नियुक्ती केलेल्या प्रशासकास बाजार समितीचे संचालक मंडळास असलेले सर्व अधिकार राहतील.

तद्वतच, पणन कायद्यातील कलम ४५(२-अ) पोट-कलम (१) अन्वये काढून टाकण्यात आलेल्या कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर या बाजार समितीच्या, समितीचा सदस्य ज्या आदेशाद्वारे त्याला अशाप्रकारे काढून टाकण्यात आले असेल, त्या आदेशाच्या दिनांकापासून सहा वर्षाचा कालावधी समाप्त होईपर्यंत, समितीचा सदस्य म्हणून पुन्हा निवडून येण्यास, पुन्हा नियुक्त केला जाण्यास, पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास, स्विकृत करून घेतला जाण्यास वा पुन्हा स्विकृत करून घेतला जाण्यास पात्र असणार नाही.

सदरहू आदेश आज दिनांक २० सप्टेंबर २०२१ रोजी माझ्या सही व  शिक्क्यानिशी पारीत केला असे.

**एम. एम. देशकर,**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, भंडारा.

भंडारा :
दिनांक २० सप्टेंबर २०२१.

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिद्ध झालेली आहे.**

१७

**शुक्रवार, ऑक्टोबर ८, २०२१/आश्विन १६, शके १९४३**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २९.

## जिल्हाधिकारी, यांजकडून

क्रमांक अका-जि.प.पं.स.-निवडणूक-कावि-६७३-२०२१.—

ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचे आदेश क्रमांक रानिआ-जिपपंस-२०२१-प्र.क.०५-का-७, दिनांक १३ सप्टेंबर २०२१ नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ९(२) व महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणूक नियम, १९६२ चे नियम ६६(१) (३) अन्वये मी, आर. विमला, जिल्हाधिकारी, नागपूर याद्वारे नागपूर जिल्हा परिषदेवर निर्वाचित सभासदांची नांवे खालीलप्रमाणे प्रसिद्ध करीत आहे :—

**अनुसूची**

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गटाचा क्रमांक व नाव | निर्वाचित सदस्याचे नाव | स्थायी पत्ता |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| नरखेड | २-सावरगांव | काळबांडे पारबती गुणवंत | रा. सावरगांव, ता. नरखेड, जि. नागपूर पिन कोड-४४१ ३०६. |
| | ४-भिष्णूर | जोध प्रवीण रामभाऊजी | वार्ड क्र. १, लोहारी सावंगा, तह. नरखेड, जि. नागपूर पिन कोड-४४१ ३०५. |
| काटोल | ५-येनवा | उमप समिर शंकरराव | मु.पो. येनवा, ता. काटोल, जिल्हा नागपूर. |
| | ६-पारडसिंगा | सरोदे मिनाक्षी संदीप | मु.पो. कोहळा, पो. ढवळापूर, ता. काटोल, जिल्हा नागपूर. |

**अनुसूची**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| सावनेर | १३-वाकोडी | शिरसकर ज्योती अनिल | क्वॉर्टर नं. ४३/४, बजाज कॉलनी, डब्ल्यू.सी.एल., वाघोडा, ता. सावनेर, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ १०७. |
| | १४-केळवद | कुंभारे सुमित्रा मनोहर | मु. नांदीखेडा, पो. तेलगाव, ता. कळमेश्वर, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ १०७. |
| पारशिवनी | १९-करंभाड | भोयर अर्चना दीपक | मु. पारडी, पो. इटगाव, ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर. |
| रामटेक | २३-बोथिया (पालोरा) | उईके हरिचंद्र गुलाब | वार्ड क्र. ०३, बोथिया पालोरा, पो. पवनी, ता. रामटेक, जिल्हा नागपूर पिन कोड नं.-४४१ ४०१. |
| मौदा | २७-अरोली | देशमुख योगेश नागोराव | मु.पो. अरोली, ता. मौदा, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ १०६. |
| कामठी | ३४-गुमथळा | ढोले दिनेश बबनराव | मु. कढोली, पो. लिहीगांव, ता. कामठी, जिल्हा नागपूर. |
| | ३५-वडोदा | लेकुरवाळे अवंतिका रमेश | रा. तरोडी बुजूर्ग, ता कामठी, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ २०२. |
| नागपूर (ग्रामीण) | ३६-गोधनी (रेल्वे) | राऊत कुंदा श्यामदेव | रा. माहुरझरी, ता. नागपूर (ग्रामीण), जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ ५०१. |
| हिंगणा | ४३-निलडोह | जगताप संजय रामकृष्ण | रा. सी/ओ. संजय पी. भोडे, एच नं. ३३९, वार्ड नं. ०६, लोकमान्य नगर, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर पिन कोड-४४० ०१६. |
| | ४४-डिगडोह | कोटगुले रश्मी धनराज | रा. एट. डिगडोह देवी, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर पिन-४४० ०१६. |
| | ४५-डिगडोह इसासनी | गिरी अर्चना कैलाश | रा. ५, काळमेघ नगर, एम.आय.डी.सी. एरिया, हिंगणा रोड, नागपूर पिन कोड-४४० ०१६. |
| कुही | ५३-राजोला | हटवार अरुण जिवतुजी | रा. वार्ड क्र. ०२, मु.पो. राजोला, ता. कुही, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ २०२. |

नागपूर :
दिनांक ०८ ऑक्टोबर २०२१.

**आर. विमला,**
जिल्हाधिकारी, नागपूर.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३०.

क्रमांक अका-जि.प.पं.स.-निवडणूक-कावि-६७३-२०२१.—

ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचे आदेश क्रमांक रानिआ-जिपपंस-२०२१-प्र.क.०५-का-७, दिनांक १३ सप्टेंबर २०२१ नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ५७ (३) व महाराष्ट्र जिल्हा

परिषदा निवडणूक नियम, १९६२ चे नियम ६० (१) अन्वये मी, आर. विमला, जिल्हाधिकारी, नागपूर याद्वारे खालील पंचायत समितीवर निर्वाचित सभासदांची नांवे खालीलप्रमाणे प्रसिद्ध करीत आहे :—

**अनुसूची**

| तालुक्याचे नाव | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव | निर्वाचित सदस्याचे नाव | स्थायी पत्ता |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| नरखेड | १-बेलोना | सातपुते हेमलता गोपाल | रा. मु.पो. बेलोना, वार्ड क्र. ०२, ता. नरखेड, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ ३०४. |
| | ३-सावरगांव | नागापूरे स्वप्नील अनंतराम | रा. पिठोरी, पो. येनिकोनी, ता. नरखेड, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ ३०६. |
| काटोल | १२-लाडगाव | ठाकरे प्रतिभा दिलीप | मु.पो. ढवळापूर, ता. काटोल, जिल्हा नागपूर. |
| | १३-मेटपांजरा | नागमोते निशिकांत जानराव | मु. आजनगाव, पो. मेंढेपठार, ता. काटोल, जिल्हा नागपूर. |
| कळमेश्वर | १७-तेलकामठी | वसू मालती धनराज | रा. तेलकामठी, ता. कळमेश्वर, जिल्हा नागपूर. |
| | १८-कोहळी | भिंगारे श्रावण महिपतराव | रा. सुसुंद्री, पो. कोहळी, ता. कळमेश्वर, जिल्हा नागपूर. |
| सावनेर | २३-बडेगाव | चिखले भावना अरुण | मु.पो. बडेगाव, ता. सावनेर, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ १०१. |
| | २६-वाघोडा | केसरे ममता प्रशांत | रा.पो. खानगाव, वार्ड क्र. ३, ता. सावनेर, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ १०७. |
| | २८-नांदागोमुख | ठाकरे गोविंदा बारकू | रा. पो. उमरी भ., ता. सावनेर, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ १०७. |
| पारशिवनी | ३५-चारगाव | दियेवार तुलसी प्रदीप | मु. सकरला, पो. दहेगाव जोशी, ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर. |
| | ३८-नयाकुंड | निंबोने मंगला उमराव | रा. पो. नयाकुंड, ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर. |
| रामटेक | ४६-उमरी | वरखडे रामक्रष्ण जिवतु | रा. घोटी, पो. हिवराबाजार, ता. रामटेक, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ ४०१. |
| | ४९-मनसर | ठाकरे कला उमेश | रा. पो. मनसर, ता. रामटेक, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ ४०१. |
| | ५१-नगरधन | बिरनवार अश्विता मुन्नीलाल | रा. पो. नगरधन, तह. रामटेक, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ १०६. |
| मौदा | ५५-खात | ठाकरे दुर्गाबाई जामुवंत | रा. खात, ता. मौदा, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ १०६. |
| | ५६-रेवराल | श्रावणकर स्वप्निल रामकृष्णा | रा. मु.पो. रेवराल, ता. मौदा, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ ४०१. |
| | ६२-चिरव्हा | पिकलमुंडे पायल अमोल | रा. मु. पानमारा, पो. गोवरी, ता. मौदा, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ १०४. |

ना.-एक-अ-४ (१६२८).

**अनुसूची**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| कामठी | ६८-महालगांव | कुथे सोनू मनोज | रा. वार्ड नं. १, मु. परसाड, पो. दिघोरी (काळे), ता. कामठी, जिल्हा नागपूर. |
| | ७०-बिडगाव | मल्लेवार आशीष रामाजी | रा. प्लॉट क्र. १, जुनी वस्ती, बिडगांव, ता. कामठी, जिल्हा नागपूर पिन कोड-४४० ०३५. |
| नागपूर (ग्रामीण) | ७१-भोकारा | राउत अपर्णा अरुण | वार्ड क्र. ०३, प्लॉट नं. ०१/०२, गोधनी रेल्वे, ता. नागपूर (ग्रामीण), जिल्हा नागपूर. |
| | ७४-दवलामेटी | ढोके सुलोचना सिद्धार्थ | प्लॉट क्र. १६४, हिलटॉप कॉलनी, दवलामेटी, ता. नागपूर (ग्रामीण), जिल्हा नागपूर पिन कोड-४४० ०२३. |
| | ८०-डोंगरगांव | खडसे उज्वला रोशन | खरसोली, पो. सालई गोधनी, ता. नागपूर (ग्रामीण), जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ २०४. |
| हिंगणा | ८५-निलडोह वडधामणा | काचोरे वैशाली विजय | रा. १०४१, साईकृपा डोबी नगर, वडधामणा, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर पिन कोड-४४० ०२३. |
| | ८७-डिगडोह-१ | राजपुत उमेशसिंह रमेशसिंह | रा. एट दुर्गा नगर, डिगडोह, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर पिन कोड-४४० ०३६. |
| | ८९-डिगडोह इसासनी | पटले लीलाधर जयपाल | रा. राय टाऊन २, इसासनी, हिंगणा रोड, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर पिन कोड-४४० ०१९. |
| | ९३-नेरी मानकर | खाडे रुपाली प्रवीण | एट डेगमा (खुर्द), ता. हिंगणा, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ ११०. |
| उमरेड | ९८-मकरधोकडा | कावटे मिनाक्षी मनोहर | मु.पो. मकरधोकडा, ता. उमरेड, जिल्हा नागपूर. |
| | १०१-देवळी | लेन्डे सुरेश दयाराम | मु.पो. मकरधोकडा, ता. उमरेड, जिल्हा नागपूर. |
| कुही | १०९-सिल्ली | कडव जयश्री हरीश | रा. मु. सातारा, पो. मुसळगाव, ता. कुही, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ २०२. |
| | ११२-तारणा | गवळी देवीदास श्रीराम | रा. मु. धामना, पो. डोंगरमौदा, ता. कुही, जिल्हा नागपूर पिन कोड-४४१ २१०. |
| भिवापूर | ११६-नांद | देशमुख माधुरी संजय | रा. धामनगाव (ग.), पो. नांद, ता. भिवापूर, जिल्हा नागपूर. |

नागपूर :
दिनांक ०८ ऑक्टोबर २०२१.

**आर. विमला,**
जिल्हाधिकारी, नागपूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.